पुढारी

संक्षिप्त



इस्लामपूर : राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल शिवानी पाटील हिचा सत्कार करताना शिक्षक.

## शिवानी पाटीलची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड

**इस्लामपूर (वार्ताहर) :** येथील प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च या वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थिनी शिवानी पांडुरंग पाटील हिची पंजाब विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत निवड झाली. ती एम.बी.बी.एस. द्वितीय वर्षामध्ये शिकत आहे. दि. १० ते १२ डिसेंबर २०१८ रोजी या स्पर्धा चंदीगड (पंजाब) येथे होणार आहेत.

## ज्युदो स्पर्धेसाठी शिवाणी पाटीलची निवड

**इस्लामपूर :** येथील प्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च या वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थिनी शिवाणी पांडुरंग पाटील (द्वितीय वर्ष एमबीबीएस) हिची पंजाब विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत निवड झाली.

दि. १० ते १२ डिसेंबरला ही स्पर्धा चंदीगड (पंजाब) येथे होत आहेत. या निवडीबद्दल शिवाणी हिचा नगराध्यक्ष, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील, अधिष्ठाता डॉ. वृषाली वाटवे, डॉ. प्रदीप कुलकर्णी, अक्षय पाटील, संदीप यादव, किशोर खंडागळे, पांडुरंग पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.